असा. क्र. २४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, मे १०, २००६/वैशाख २०, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**--मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . | **१७३–१७७** |

दिनांक ९ मे २००६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक १० मे २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम १४४ई समाविष्ट करणे.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १४४ड नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणे.

" **१४४ई.** या अधिनियमाच्या कलम १४० मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष विकास प्रकल्पांच्या मालकीच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता व वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " विशेष विकास प्रकल्प " याचा अर्थ,—

(एक) शासनाने किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१९) च्या अर्थांतर्गत असलेला, नियोजन प्राधिकरणाने हाती घेतलेला विकास प्रकल्प ; किंवा १९६६ चा महा. ३७.

(दोन) एकत्रित प्रोत्साहन योजना, २००१ च्या अंतर्गत असलेला " मेगा प्रकल्प ", आणि शासनाच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मान्य केलेला व राज्य शासनाने, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष विकास प्रकल्प म्हणून घोषित केलेला प्रकल्प, असा आहे.".

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९२ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १९२ ची सुधारणा.

"(५) या कलमात किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १४४ई अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता अनुसूची **ह** मध्ये नमूद केलेल्या वस्तूंच्या बृहन्मुंबईमधील प्रवेशावरील जकात कर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. ".

१९४९ चा मुंबई ५९. **४.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्रांतिक महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १२९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम १२९-१अ समाविष्ट करणे.

"**१२९-१अ.** कलम १२९ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष विकास प्रकल्पांच्या मालकीच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता व वेगवेगळ्या विशेष प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणे.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "विशेष विकास प्रकल्प" याचा अर्थ,—

१९६६ चा महा. ३७. (एक) शासनाने किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१९) च्या अर्थांतर्गत असलेला, नियोजन प्राधिकरणाने हाती घेतलेला विकास प्रकल्प ; किंवा

(दोन) एकत्रित प्रोत्साहन योजना, २००१ च्या अंतर्गत असलेला "मेगा प्रकल्प", आणि शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मान्य केलेला व राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष विकास प्रकल्प म्हणून घोषित केलेला प्रकल्प, असा आहे. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १४९ ची सुधारणा.

**५.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या, कलम १४९ मध्ये, पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (६) या कलमामध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १२९-१अ अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता, वस्तुंच्या शहरातील प्रवेशावरील जकात कर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. ".

सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १५२अ ची सुधारणा.

**६.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १५२अ मध्ये, पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) या कलमामध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १२९-१अ अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता मालाच्या शहरातील प्रवेशावरील उपकर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. ".

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम ११५-कक समाविष्ट करणे.

**७.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ११५-क नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर व जकात आकारणे.

" **११५-कक.** कलम ११४, ११५ यांमध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) विशेष विकास प्रकल्पांच्या मालकीच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील ;

(ख) विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता शहरात येणाऱ्या मालाच्या प्रवेशावर राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने उपकर किंवा जकात कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता व वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील :

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनांसाठी, " विशेष विकास प्रकल्प " याचा अर्थ,—

१९६६ चा महा. ३७. (एक) शासनाने किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१९) च्या अर्थांतर्गत असलेला, नियोजन प्राधिकरणाने हाती घेतलेला विकास प्रकल्प ; किंवा

(दोन) एकत्रित प्रोत्साहन योजना, २००१ च्या अंतर्गत असलेला " मेगा प्रकल्प ", आणि शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने मान्य केलेला व राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष विकास प्रकल्प म्हणून घोषित केलेला प्रकल्प, असा आहे. ".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई